# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार

तक्रार क्र. रामाआ /२६१/२०२१/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| गणेश संजय बेंद्रे | उप शिक्षण अधिकारी (माध्यमिक),जिल्हा परीषद, यशवंत राव चव्हाण भवन, पुणे ०१ | शिक्षणाधिकारी,जिल्हा परीषद, यशवंत राव चव्हाण भवन, पुणे ०१ |

<u>तक्रार सुनावणी दिनांक- ११/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. १५/११/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्र.२९५०/२०१६/पुणे मध्ये सुनावणी घेऊन दि.१७/०१/२०१८ रोजी आदेश पारित केले होते. त्यामध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांना आदेशित करण्यांत येते की, अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पाठविली असल्यास सदर माहितीची प्रत अपिलार्थीस आरपीएडीने पुन्हा विनामुल्य पाठवावी."

त्यामध्ये दि.११/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणी दरम्यान तक्रारदार श्री. गणेश बेंद्रे हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षण अधिकारी, (माध्यमिक) जि.प.पुणे गैरहजर आहेत.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी सूचित केले की, दि.०१/०१/२०२२ रोजी शिक्षण आयुक्त, म.रा.पुणे यांना पत्र देऊन संबंधितांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार केली होती. त्या आधारावर त्यांनी दि.१४/११/२०२२ रोजी शिक्षण अधिकारी, (माध्यमिक) जि.प.पुणे यांना पत्र देऊन आयोगाचे आदेशावर कार्यवाही झाली किंवा कसे याची तपासणी करण्याबाबत कळविले आहे.

आज सुनावणीचे वेळी उप शिक्षण अधिकारी, (माध्यमिक) जि.प.पुणे हे अनुपस्थित आहेत. अपिलार्थी हजर आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमिवर  आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१. उप शिक्षण अधिकारी, (माध्यमिक) जि.प.पुणे यांना आदेशित करण्यांत येते की, पुढील सुनावणीचे वेळी आयोगाचे आदेशावर केलेल्या कारवाईबाबतचा पुरावा सादर करण्यासाठी अंतीम वेळ देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीचे वेळी जर उपशिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांनी स्वत: उपस्थित राहुन केलेल्या कार्यवाहीबाबत पुरावा सादर केला नाही तर, त्यांना हया प्रकरणात काही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही केली जाईल.

२. शिक्षण अधिकारी, (माध्यमिक) जि.प.पुणे यांनी वरिल आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि आयोगाचा आदेश दि.१७/०१/२०१८ रोजी जे उपशिक्षण अधिकारी (माध्यमिक) होते त्यांना पुराव्यासह त्यांचा खुलासा आयोगाकडे सादर करण्यास सूचित करावे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार - २६१/२०२१/पुणे/5118 दिनांक 13/12/2023